दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २८५ वा रविवार दि.११ मे २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## बोलायचं नसतं, डायरेक्ट क्शन घ्यायची असते, शरद पवारांच्या विधानाने सर्वांच्याच भुवया उंचावल्या



पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत पाकिस्तानला 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे जोरदार उत्तर देत आहे. भारताने दहशतवाद्यांच्या तळांवर हल्ला केल्यानंतर ७ मे रोजी पाकिस्तानने भारताच्या सीमावर्ती भागात गोळीबार केला.

तर ८ मे रोजी पाकिस्तानने भारताच्या अनेक भागांना मिसाईल आणि ड्रोनद्वारे लक्ष्य केले होते. भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने त्यांना हवेतच नष्ट केले. सलग दुसऱ्या दिवशीही पाकिस्तानने भारताच्या काही भागांवर ड्रोन आणि मिसाईलद्वारे हल्ला केला. मात्र भारताने नापाक हल्ले परतावून लावले आहे. दरम्यान, भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय स्तरावरून दोन्ही देशांना संयम ठेवण्याचं आणि शांतता बाळगण्याचं आवाहन करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष आणि माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी एक विधान केलं आहे. त्यांनी केलेल्या विधानाने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. शरद पवार म्हणाले, भारत-पाकिस्तान तणावावर बोलायचं नसतं तर डायरेक्ट क्शन घ्यायची असते, असं शरद पवार म्हणाले. बारामतीत येथे शरद पवार यांना भारत-पाकिस्तान तणावावर आंतरराष्ट्रीय पातळीवरून होणाऱ्या अपीलबद्दल विचारण्यात आलं असता त्यांनी हे विधान केलं आहे. छोटा पुढारी घनश्याम पाकला दिला दम छोटा पुढारी या नावाने ओळख निर्माण केलेला घनश्याम दरोडे याने एका यूट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत पाकवर जळमळीत टीकास्त्र डागली आहेत. आमच्या नादीला लागू नका. तुम्ही का भारताच्या नादी लागताय? भारत देशाने आणि मोदी साहेबांनी ठरवलं तर तुम्हाला तिकडं येऊन ठोकायला अर्धा तासही लागणार नाही, असे घनश्याम म्हणाला आहे.

## गुरुलिंग हासूरे यांना न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार – डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर



निलंगा तालुका व औसा मतदारसंघातील कासार सिरशी पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या औंढा या गावात दि. २६ एप्रिल रोजी जमावाने केलेल्या मारहाणीत मृत्यू झालेल्या बडूर येथील शिक्षक गुरुलिंग हासूरे यांच्या मारेकऱ्यांना अटक व्हावी यासाठी बडूर येथे ग्रामस्थांनी सुरुवात केलेल्या साखळी उपोषणास गुरुवार दि. ८ एप्रिल रोजी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी भेट देऊन ग्रामस्थांच्या भावना जाणून घेतल्या



बडूर येथे २ मे पासून हासूरे कुटुंबीय व बडूर ग्रामस्थांनी गुरुलिंग हासूरे यांना न्याय मिळावा यासाठी साखळी उपोषण सुरु केले असून गुरुवार दि. ८ एप्रिल रोजी उपोषणाच्या आठव्या दिवशी डॉ. अर्चनाताई पाटील यांनी भेट देऊन बडूर ग्रामस्थांच्या भावना जाणून घेतल्या व उपोषणस्थळावरून मुख्यमंत्री कार्यालय तसेच पोलिस उप महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र श्री शहाजी उमाप साहेब यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत त्याना संपूर्ण घटनेची सविस्तर माहिती दिली व यासंबंधी लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करून हासुरे कुटुंबियांना न्याय मिळवून द्यावा यासाठी विनंती केली.यावेळी त्यांनी बडूर ग्रामस्थ व हासूरे कुटुंब यांनी सुरु केलेल्या या लढाईत आपण सोबत असल्याचे सांगत हासूरे कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या प्रकरणतील सर्व आरोपीना अटक व्हावी, हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा, आरोपीना योग्य शिक्षा व्हावी यासाठी निष्णात वकील देण्यात यावा व सीमावर्ती भागातील गावागुंडंची दहशत कमी व्हावी यासाठी आपण मुख्यमंत्री यांची भेट घेऊन ग्रामस्थांच्या भावना देवेंद्रजिपर्यंत पोहोचविणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यानंतर त्यांनी हासूरे यांच्या घरी भेट देऊन कुटुंबियांचे सांत्वन केले.यावेळी कासार सिरसी चे एपीआय प्रवीण राठोड यांची भेट घेऊन तपासात होतं असलेल्या दिरंगाईबाबात विचारणा केली. यावेळी त्यांच्यासोबत किरण उटगे, भीमाशंकर राचटे, सुनिल उटगे, ज्ञानेश्वर वाकडे, नाना धुमाळ, मल्लिकार्जुन दानाई, नितीन पाटील, रणजित कोकणे, मयूर गबुरे, विरेश चिंचन्सूरे, संजय गोला, बालाजी बिराजदार यासह गावातील व परिसरातील नागरिक, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

----------


आमच्या गुरु सरांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे म्हणतं उपस्थित महिलांनी अर्चनाताई यांच्याकडे दाटलेल्या कंठाणे मागणी केली असता उपस्थित सर्वांना गहिवरून आले.

---------

अर्चनाताई घरी येताच गुरुलिंग हासूरे यांच्या आई, पत्नीने टाहो फोडत आम्हाला न्याय देण्याची मागणी केली. माझ्या नातुची विनाकारण हत्या करण्यात आली असून मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली हे माझ्या कानाला मी जिवंत असेपर्यंत ऐकायचे आहे असे आजीने म्हणताच उपस्थित्यांच्या डोळ्यात अश्रू आले.

## दहशतवाद्यांनी भरलेला देश, जगाच्या नकाशावरून पुसून टाका; कंगणाने व्यक्त केला संताप

अभिनेत्री आणि भाजप खासदार कंगणा राणावत तिच्या विधानांमुळे नेहमीच चर्चेत राहिली आहे. याशिवाय सोशल मीडियावर देखील ती अनेकदा आपली मते मांडताना दिसते. सध्या भारत-पाकिस्तानमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. यादरम्यान, कंगणाने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यात तिने पाकिस्तानवर निशाणा साधला आहे.



भारतीय लष्कराच्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानने कुरापती करण्यास सुरुवात केली आहे. पाकिस्तानने भारताच्या अनेक भागांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोनद्वारे हल्ला करण्याचा नापाक प्रयत्न केला. त्यावर कंगनाने तिच्या इन्स्टाग्रामवर थखजछ या वृत्तवाहिनीच्या एका रिपोर्टला रीपोस्ट केले आहे.

सोबत तिने लिहिले की, 'ब्लडी कॉक्रोच भीषण, दहशतवाद्यांनी भरलेला वाईट देश, जगाच्या नकाशावरून पुसून टाकला पाहिजे,' असे म्हणत तिने आपला संताप व्यक्त केला आहे. यापूर्वी कंगनाने एक व्हिडिओ शेअर करत भारतीय ड-४०० क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीचं कौतुक करण्यात केले होते.

दिल्लीवरील मोठा हल्ला परतवला

पाकिस्तानने पहाटे ४:००च्या सुमारास डागलेली फतेह २ मिसाईल हरियाणाच्या सिरसाच्या आकाशात पोहोचली होती. ही मिसाईल हरियाणाच्या आकाशात आल्यावर भारतीय सैन्याने एअर डिफेन्सद्वारे पाडली. यामुळे दिल्लीवरील मोठा हल्ला परतवून लावण्यात आला आहे.

पाकिस्तानने भारताच्या नागरी वस्त्यांना लक्ष्य करत ड्रोन हल्ला केला होता. मात्र काही वेळातच भारतीय लष्कराने पाकला जशास तसं उत्तर दिलं. पाकिस्तानमधील तीन महत्त्वाच्या एअरबेसला टार्गेट करत भारताकडून प्रतिहल्ला करण्यात आला आहे. नूर खान, रफिक आणि मुरिद एअरबेस भारताकडून लक्ष्य करण्यात आलं आहे.

## भारतीय सैन्याने पाकिस्तानचा बुरखा फाडला; खोटे दावे करताच केली पोलखोल

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. या दहशतवादी हल्ल्यात निष्पाप लोकांचा बळी घेतल्यानंतर भारताने ७ मे रोजी पाकिस्तानमधील ९ दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला केला. त्यानंतर पाकिस्तानने देखील भारतावर ड्रोन, मिसाईलद्वारे हल्ले केले आहेत.

मात्र भारतीय लष्काराने देखील पाकिस्तानचे हे सर्व हल्ले उलथवून टाकले आहेत. यातच पाकिस्तानकडूनअनेक फेक न्यूज पसरवल्या जात आहेत. भारतीय तळांवरच्या हल्ल्यांसंबंधी पाककडून दिशाभूल सुरु आहे. मात्र पाकचे दावे भारताने फेटाळून लावले आहेत. नुकतेच परराष्ट्र मंत्रालयाने पत्रकार परिषद घेतली. कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी पाकिस्तानकडून सुरू असलेल्या हल्ल्याची आणि खोट्या दाव्याची माहिती दिली.

पत्रकार परिषदेत कर्नल सोफिया कुरेशी यांनी सांगितले की, पाकिस्तानी सैन्याने पश्चिमी सीमेवर हल्ले केले आहेत. नियंत्रण रेषेवर २६ ठिकाणी पाकिस्तानने हवाई घुसखोरीचा प्रयत्न केला आहे. भारतीय सैन्य तळांना टार्गेट करण्याचा पाकने प्रयत्न केला. एलओसीवर सातत्याने गोळीबार केला जात आहे. श्रीनगरपासून अनेक ठिकाणांवरून हवाई घुसखोरीचा प्रयत्न केला त्याला भारतीय सैन्याने उत्तर दिले.

'पाकिस्तान नागरी विमानांचा गैरवापर करत आहे'

उधमपूर, भटिंडासारख्या ठिकाणी उपकरणांना नुकसान पोहचवले. पंजाबच्या एअरपेसवर मिसाईड डागण्याचा प्रयत्न केला. अनेक ठिकाणी वैद्यकीय सेवांना टार्गेट केले. भारतीय सैन्यानेही पाकचे हल्ले परतावून लावले. पाकिस्तान नागरी विमानांचा गैरवापर करत असल्याने भारतीय सैन्याने संयमाने प्रत्युत्तर दिले आहे, असेही त्यांनी सांगितले. याशिवाय सियालकोटचा हवाई तळ भारतानं उद्धस्त केलं आहे. लाहोरमधून नागरी विमानांच्या आडून पाकनं हल्ले केले आहेत. पाकिस्तानने भारतातील नागरी वस्ती आणि लष्करी तळांना लक्ष्य करुन हल्ले केले. ड्रोन आणि क्षेपणास्त्राच्या साह्याने शाळा आणि वैद्यकीय सेंटरला लक्ष्य केलं, असे कर्नल कुरैशी यांनी म्हटले. पाकिस्तानकडून लाहोरवरुन नागरी हवाई उड्डाणासाठी वापरण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय मार्गाचा दुरुपयोग केला जात आहे. पाकिस्तानी विमानांच्या हालचाली गुप्त ठेवण्यासाठी हे सुरु आहे. तसेच पाकिस्तानकडून भारताविरोधात अपप्रचार केला जात असल्याचेही कर्नल सोफिया कुरेशी यांनी सांगितले.



'चुकीच्या बातम्या पाकिस्तानकडून पसरवल्या जात आहेत'

तसेच भारताची एस-४०० ही यंत्रणा निष्क्रीय केल्याचा दावा पाकिस्तानने केला होता. मात्र हा दावा अतिशय निराधार आणि खोटा असल्याचं आज भारत सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. सूरतगड, चंदीगडसारख्या अनेक शहरांत शस्त्रसाठा नष्ट केल्याच्या चुकीच्या बातम्या पाकिस्तानकडून पसरवल्या जात आहेत. भारतीय एअरफोर्सला नुकसान पोहचवल्याचा पाकचा दावा खोटा आहे. सिरसा, सूरत एअरबेसचे व्हिडिओ, फोटो पत्रकार परिषदेत दाखवत येथे कोणतेही नुकसान झालेले नाही असं सांगण्यात आले. अशा पद्धतीने पाकने केलेल्या खोट्या दाव्यांचा पत्रकार परिषदेत सोफिया कुरेशी यांनी बुरखा फाडला आहे.

## जय हिंद म्हणत मुलाचा वाढदिवस सोडून लातूरचा कैलास सूर्यवंशी जवान सीमेवर रवाना







लातूर :- भारत -पाक दरम्यान वाढलेला तणाव पाहता भारतीय लष्कराने जवानांच्या सुट्टया रद्द केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अनेक जवान ऑपरेशन सिंदूर मध्ये सहभागी होण्यासाठी सीमेकडे परतत आहेत. लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यात असलेल्या जावळी या गावचा जवान कैलास तुकाराम सूर्यवंशी मुलाचा वाढदिवस सोडून काल संध्याकाळी बिकानेर सीमेवर कर्तव्यावर हजर राहण्यासाठी रवाना झाला.

लातूरचा कैलास हा २००४ मध्ये सीमा सुरक्षा दलात दाखल झाला. सध्या तो ४५ दिवसांच्या रजेवर आपल्या गावी आला होता. आज त्याच्या मुलाचा पहिला वाढदिवस होता मात्र आपली सुट्टी रद्द झाली असून तात्काळ कर्तव्यावर हजर होण्याचे आदेश आल्याचा निरोप आला. क्षणाचाही विलंब न करता कैलास मुलाचा वाढदिवस सोडून रजेच्या ११ व्या दिवशी काल ९ मे २०२५ रोजी संध्याकाळी लातूर - मुंबई या रेल्वेने राजस्थान येथील बिकानेर सीमेवर हजर राहण्यासाठी रवाना झाला. याप्रसंगी कैलासचे वडील, नातेवाईक, गावकरी उपस्थित होते. कैलाससह त्याचे वडील सर्व नातेवाईक भाऊक झाल्याचे दिसून आले.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## अघोषित युद्धातील वज्राघात

भारताच्या एअरस्ट्राईकनंतर देशातील जनतेमधील प्रतिमा टिकवण्यासाठी पाकिस्तानच्या लष्कराला भारताविरुद्ध कारवाई करणे अपरिहार्य होते. पण या कारवाईला भारताच्या अत्याधुनिक शस्त्रसामग्रीने आणि लष्कराच्या अचूक नियोजनामुळे निष्प्रभ करण्यात आले. पाकिस्तानची क्षेपणास्त्रे, ड्रोन्स हवेतच उद्ध्वस्त झाली. एक विमान पाडण्यात आले. यावरून पाकिस्तानला योग्य तो संदेश गेलेला असावा. काही अभ्यासकांच्या मते, ही लढाई खूप दीर्घकाळ चालणारी आहे. पण मागील तीन युद्धांप्रमाणेच याही वेळी भारत पाकिस्तानला धडा शिकवेल यात शंका नाही. पण यावेळी असा वज्राघात केला पाहिजे की, पाकिस्तानची पुन्हा हिंमत होणार नाही.

दहशतवाद्यांवर केलेल्या एअरस्ट्राईकनंतर पाकिस्तान काही ना काही हालचाल करणारच, याबाबतचे अंदाज वर्तवले जात होते. वास्तविक भारताने केवळ दहशतवादी पायाभूत रचनांवरच हल्ला केला होता. परंतु पाकिस्तानकडे असे विशिष्ट लक्ष्य नसल्याने त्याने भारतातील लष्करी ठिकाणांना आणि सर्वसामान्य नागरिकांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. संरक्षण मंत्रालयाच्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री पाकिस्तानने भारताच्या उत्तर आणि पश्चिमेकडील १५ शहरांतील अनेक लष्करी ठिकाणांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोनद्वारे हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र भारतीय लष्कराने तो यशस्वीरीत्या उधळून लावला. उलट या कारवाईच्या प्रत्युत्तरादाखल, भारताने पाकिस्तानचे हवाई संरक्षण नेटवर्क पूर्णतः बेचिराख करून आपली क्षमता व अत्याधुनिकता दाखवून दिली.

सीमारेषेवर गोळीबार करणे हा पाकिस्तानकडे उरलेला एकमेव पर्याय आहे आणि याचा वापर सध्या पाकिस्तान करत आहे. भारतीय नागरिकांना लक्ष्य करण्यामागे पाकिस्तानची खुमखुमी दिसत आहे; मात्र, त्याला देखील भारताने योग्य प्रतिसाद दिला आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो की, या सर्व मार्यांच्या माध्यमातून पाकिस्तानला पूर्ण युद्धाकडे जायचे आहे का? सध्या तरी तसे वाटत नाही. कारण पूर्ण युद्धासाठी पाकिस्तान तयार आहे, असे दिसत नाही. तसेच पाकिस्तानला याची पूर्ण कल्पना आली आहे की, आपण आक्रमकता दाखवली, तर भारत त्याला शतप्रतिशत कठोर प्रत्युत्तर देण्यास सक्षम आहे. गुरुवारी आणि शुक्रवारी भारताने पाकिस्तानकडून डागली गेलेली क्षेपणास्त्रे, ड्रोन, विमाने या सर्वांना हवेतच उडवून देऊन योग्य तो संदेश दिला आहे.

भारताची सैन्य क्षमता पाकिस्तानपेक्षा निश्चितपणे अधिक आहे. संख्यात्मक आकड्यांचाच विचार करायचा झाला तर सैनिकांची संख्या, तंत्रज्ञान किंवा लष्करी उपकरणांची तुलना केली, तर भारत पाकिस्तानपेक्षा बराच पुढे निघून गेलेला आहे. केवळ लढाऊ विमानांच्या संख्येतच नव्हे, तर प्रगत आणि आधुनिक विमानांच्या बाबतीतसुद्धा भारत सरस आहे. तसेच भारताला आंतरराष्ट्रीय समुदायाचे अधिक समर्थन आहे. त्यामुळे पाकिस्तानने सध्या सुरू असलेले हल्ले वेळीच थांबवले नाहीत, तर त्याला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल.

जागतिक समुदाय दोन्ही देशांदरम्यान तणाव कमी करण्याचा सतत प्रयत्न करत आहे. भारत आणि पाकिस्तान दोघेही अण्वस्त्र सुसज्ज राष्ट्रे असल्यामुळे रशिया – युक्रेन युद्ध आणि इस्रायल – हमास संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दक्षिण आशियामध्ये नवे युद्धसदृश वातावरण निर्माण होऊ नये, असे जगाला वाटते. भारताची प्रतिमा एक जबाबदार देश म्हणून उभी राहिली आहे. 'ऑपरेशन सिंदूर'ची माहिती देताना आपण स्पष्ट केले होते की, ही कारवाई लक्ष्यित असून भारत तणाव वाढविण्याच्या बाजूने नाही.

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी इराणमध्ये बोलतानाही हीच भूमिका स्पष्टपणे मांडली. पण पाकिस्तानच्या वर्तनातून तणाव वाढविण्याचा कल स्पष्टपणे उजागर होत आहे. अशा वेळी परराष्ट्रमंत्री जयशंकर यांचे विधान अत्यंत महत्त्वाचे ठरते की, भारतावर हल्ला झाला, तर अत्यंत कठोर प्रत्युत्तर दिले जाईल. या सार्या घडामोडीत काही बाबी ठळकपणे स्पष्ट होतात. पहिली म्हणजे, भारताने पुन्हा एकदा पाकिस्तानला स्पष्ट संदेश देत लक्ष्मणरेषा आखली आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांच्या शब्दांत सांगायचे, तर 'न्याय मिळविण्यासाठी' केलेली ही कारवाई पहलगामवरील हल्ल्याच्या भावनिक उद्वेगातून केलेली नव्हती तर लष्करी आणि लष्करबाह्य पातळीवरील सखोल विचार करून केलेली होती. 'ऑपरेशन सिंदूर' हे २०१६ च्या सर्जिकल स्ट्राईक आणि २०१९ च्या बालाकोट एअर स्ट्राईकपेक्षा अनेक पटींनी प्रगत होते. कारण लक्ष्यांची संख्या अधिक होती, ती विविध प्रकारची होती. पाकिस्तानच्या सीमा ओलांडून सुमारे १५० कि.मी. आतमध्ये आपण त्यांना ठोकले. या कारवाईत २४ प्रकारच्या क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आल्यामुळे परिणाम अधिक व्यापक झाला. यातून भारत आपल्या सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी समर्थ आहे, हे जगाला कळून चुकले. दुसरी बाब म्हणजे 'ऑपरेशन सिंदूर' ही एक संयुक्त मोहीम होती. सरकारने स्पष्ट केले आहे की, ही मोहीम अजूनही सुरू आहे, याचा अर्थ सहभागी संस्थांमध्ये सुसूत्रता आहे.

राफेल लढाऊ विमानांचा वापर, स्काल्प आणि हॅमरसारख्या अत्याधुनिक क्षेपणास्त्रांचा वापर, ड्रोन आणि बॉम्बगोळ्यांचा मारा, तसेच मानवविरहित हवाई साधनांद्वारे हल्ला करणे, त्यानंतर लगेचच तंतोतंत आणि रिअल टाईम माहिती मिळवणे व त्यावर प्रक्रिया करणे या सर्वांमधून भारताची क्षमता आता पूर्वीपेक्षा वेगळी आणि अधिक विकसित झाली आहे, हे पाकिस्तानने समजून घ्यायला हवे. तिसरी बाब, मनोवैज्ञानिक युद्धातही भारताने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. कारण देशातून जनमताचा मोठा दबाव असूनही सरकारने संयम ठेवला. पाकिस्तानवर दबाव टाकण्यासाठी लष्कराला सज्जतेचा आदेश देण्यात आला होता. पण योग्य वेळ आल्यावरच कारवाई केली गेली. पाकिस्तानच्या अंतर्गत सुरक्षेची स्थिती आणि त्याची आर्थिक दुर्दशा लक्षात घेता हा तणाव फार काळ टिकणार नाही.

आणखी एक बाब म्हणजे, पहलगाम प्रकरणाबाबत आंतरराष्ट्रीय समुदायाला वेळोवेळी माहिती देण्याची भारताची कूटनीतिक भूमिका यशस्वी ठरली आहे. चीन आणि तुर्की या काही देशांना वगळता बहुतांश प्रभावी देशांनी भारताला पाठिंबा दिला आहे. हे धोरण भविष्यातील तणाव कमी करण्यात पुन्हा उपयुक्त ठरू शकते. आता प्रश्न आहे पुढे काय? सर्वप्रथम पाकिस्तानने धर्मांध कट्टरतेच्या दिशेने वळणार्या देशांतर्गत चर्चा थांबवायला हव्यात. आज सोशल मीडियावर या चर्चांना वेगळे वळण मिळत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

# पक्षाचे अस्तित्व टिकविण्याचे शरद पवार यांच्यापुढे आव्हान

ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांच्यापुढे त्यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अस्तित्व टिकविण्याचे फार मोठे आव्हान उभे राहिले आहे. पक्षामध्ये फूट पडून दोन वर्षे व्हायच्या आतच पक्षामध्ये जबरदस्त गळती सुरु झाली आहे आणि शरद पवार यांना ते पाहात बसण्याशिवाय गत्यंतर राहिलेले नाही, हे कटु वास्तव आहे.

गेल्या साठ वर्षांहून अधिक काळ राजकारणावर भक्कम पकड असलेल्या शरद पवारांची आपल्या पक्षावरचीच नव्हे तर एकूणच राजकारणाची पकड ढिली झाल्याचे चित्र पुढे येत आहे. ४७ वर्षांपूर्वी १९७८ सालात 'वसंत ऋतु संपला, शरद ऋतु सुरू', अशा मथळ्याच्या बातम्या असत. आता एकविसावे शतकाने पंचविशी गाठली असताना नवा ऋतू आणि नवे पर्व महाराष्ट्रात उदयाला आले आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या त्रिपक्षीय महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. मात्र त्या पाठोपाठ झालेल्या विधानसभा निवडणुकीत या तिन्ही पक्षांचा दारुण पराभव झाला. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे याआधी १५ आमदार होते. ते संख्याबळ दहावर आले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने मात्र चांगले यश मिळवत ४१ जागा जिंकल्या. प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील त्यांचा प्रभाव दिसून आला आणि तेवढ्याच प्रमाणात शरद पवार यांच्या दीर्घकालीन वर्चस्वाला ओहोटी लागल्याचेही दिसून आले. सातारा जिल्हा हा त्यांचा बालेकिल्ला म्हटला जायचा. पण या जिल्ह्यात त्यांचा एकही उमेदवार निवडून आला नाही तर भाजपचे चार, शिंदे शिवसेनेचे दोन आणि अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन अशा आठही जागा महायुतीने जिंकल्या. कोल्हापूर जिल्ह्यातही शरद पवारांना एकही जागा मिळाली नाही. सांगली जिल्ह्यात त्यांच्या पक्षाचे जयंत पाटील आणि स्व. आर. आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील हे विजयी झाले. या यशात शरद पवारांच्या पक्षाच्या वाटा किती हा प्रश्नच आहे. पवारांच्या पुणे जिल्ह्यातही त्यांना यश मिळाले नाही आणि अहिल्यानगर जिल्ह्यातही त्यांचे नातू रोहित पवार वगळता पवारांचा करिष्मा चालला नाही. या निवडणुकीत पक्षाची वाताहतच झाली.

१९७८ मध्ये शरद पवारांनी काँग्रेस पक्ष फोडून पुलोद सरकार बनवले, तेव्हा त्यांच्याबरोबर पक्षाचे ३८ आमदार होते. १९९९ मध्ये त्यांनी पुन्हा पक्षात फूट पाडली. राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली, तेव्हा त्यांच्या बरोबर पक्षातील ५१ आमदार होते. १९७८ पासून २०१९ पर्यंत पवारांच्या नेतृत्वाखाली लढवल्या गेलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांच्या पक्षाच्या आमदारांची उच्चांकी संख्या सत्तरच्या आसपास राहिली. याउलट त्यांच्याबरोबरच्या मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव यांनी आपापल्या राज्यात स्वबळावर सत्ता स्थापन केली आणि त्यांच्या पुत्रांनीही आपले वर्चस्व राखले. शरद पवारांना ज्युनिअर असणार्या ममता बॅनर्जी यांनी स्वतंत्र पक्ष स्थापन करून स्वबळावर सत्ता मिळवली. शरद पवार यांना अशी किमया करता आली नाही. आजवरच्या त्यांच्या राजकारणी चालीत आणि कात्रजच्या घाटाच्या डावपेचात त्याचे



कारण दडलेले आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

त्यातूनच आता शरद पवार यांना आपल्या पक्षात मोठ्या प्रमाणात पडझड झाल्याचे पाहावे लागत आहे. सांगली जिल्ह्यातील शिवाजीराव नाईक, राजेंद्रआण्णा देशमुख हे शरद पवारांचे मानले जाणारे माजी आमदार अलीकडेच अजित पवार यांच्या पक्षात सामील झाले. गेल्या आठवड्यात खानदेशातील शरद पवारांच्या संघटनेला जबरदस्त खिंडार पडले. जळगाव जिल्ह्यातील गुलाबराव पाटील, डॉ. सतीश पाटील हे माजी मंत्री, कैलास पाटील, दिलीप सोनवणे, तिलोत्तमा पाटील हे माजी आमदार अशा मातब्बर नेत्यांनी शरद पवार यांची साथ सोडली आणि या नेत्यांसह स्थानिक स्वराज्य संस्थेतील अनेक कार्यकर्त्यांनी अजित पवार यांच्या पक्षात प्रवेश केला. शरद पवार यांच्या पक्षास इतःपर भवितव्य राहिलेले नाही, याच तीव्र विचारातून त्यांनी हे पक्षांतर केले, हे स्पष्टच आहे.

अजित पवार यांचे चिरंजीव जय यांच्या साखरपुड्याच्या निमित्ताने पवार कुटुंबीय एकत्र आले होते. वसंतरावदादा पाटील शुगर इन्स्टिट्यूटच्या बैठकीत काका-पुतणे एकत्र होते. रयत शिक्षण संस्थेच्या कार्यकारिणी बैठकीतही दोघांची उपस्थिती होती. या पंधरवड्यातील घडामोडीत काका-पुतण्यांची काही अंतस्थ चर्चा झाली का, याचे तर्ककुतर्क सुरू आहेत. अजित पवार यांनी 'शिवसेना चालते, मला भाजप का नको', हा उपस्थित केलेला मुद्दाही चर्चेचा बनला आहे. काकांना पुतण्याने दिलेले हे निमंत्रण समजायचे का, अशीही कुजबुज चालू झाली आहे. या सार्या घडामोडी होत असताना शरद पवार यांनी बोलावलेल्या निकटवर्तीयांच्या बैठकीत दोन्ही पक्षांचे विलीनीकरण व्हावे, असे खलबत झाल्याचे आणि त्यावर शरद पवार यांनी मौन बाळगल्याच्या बातम्या आहेत. पुण्यातील एका बैठकीतही पाच आमदारांनी शरद पवारांकडे हाच विचार मांडला. पण पवारांनी त्याला प्रतिसाद दिला नाही.

शरद पवार यांच्या पक्षातील गयारामांची वाढती संख्या, कौटुंबिक पातळीवर दिलजमाईच्या दृष्टीने होणारी काही वक्तव्ये, पक्षातील आमदारांचे दडपण या सार्या घडामोडींचा आढावा घेतला, तर नजीकच्या काळात या दोन पक्षांचे नवे समीकरणही तयार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. २०१९ मध्ये शरद पवार यांनी सत्ता स्थापण्यासाठी भाजपला पाठिंबा दिला होता. ज्या पुतण्याविरोधात बोलताना कुटुंबप्रमुख आणि पक्षप्रमुख मीच आहे, असे जरबेचे उद्गार काढणार्या शरद पवार यांना पुतण्याशी हातमिळवणी करायची म्हणजे धर्मसंकटच वाटत असणार. पुन्हा पक्षाचे अस्तित्व टिकवायचे आव्हान कसे पेलायचे हाही प्रश्नच आहे. त्यांनी आजवरचे जे डावपेच रचले, तेच उलटले. त्याच चक्रव्यूहात ते अडकले आहेत.

'लोक माझे सांगाती' हे त्यांचे आत्मचरित्र. पण आता सोबत किती सांगाती आहेत, याचाच धांडोळा त्यांना घ्यावा लागणार आहे.

शरद पवारांच्या मनात नेमके काय?

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसजन एकत्र आले तर आश्चर्य वाटायला नको, असे विधान खा. शरद पवार यांनी गुरुवारी केले आहे. खा. सुप्रिया सुळे, आ. जयंत पाटील हे निर्णय घेतील, असेही वक्तव्य त्यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्यांनी त्यांची भूमिका दोन्ही राष्ट्रवादी गटांनी एकत्र यावेत अशी आहे काय, अशी चर्चा आहे. त्यांच्या मनात नेमके काय आहे, हे कोणालाही सांगता येणार नाही हेही तेवढेच खरे आहे.

# प्रेम व निस्वार्थ मायेचा वटवृक्ष म्हणजेच माय!

आईचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारला मातृदिन (मदर्स डे) साजरा केला जातो.त्या अनुषंगाने यावर्षी मातृदिन ११ मे २०२५ रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते.या जगात माय-बापा शिवाय कोणीही मोठा नाही. आई-वडील,माय-बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही. कारण आई-वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी व जीवजंतू या शब्दाशी निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती, संस्कार,संस्कृती, जडणघडण,रहनसहन सर्वत्र दिसून येते.ज्याप्रमाणे आई - वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची(मुलांची)जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात.ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई-वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही हेही तितकेच सत्य आहे. कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई-वडीलांची भुमिका समान असते. आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई-वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा. आईचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजे.परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी मातृदिनला महत्व आहे.पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात यात यत्किंचितही फरक नाही.फक्त जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असतात त्यामुळे मुल-मुली यांच्या केसालाही धक्का लागणार नाही याची काळजी नेहमी घेऊन तत्परता दाखवित असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे. त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सूरूवात १९०८ साली अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली व अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत.मातृत्व दिन(मदर डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर डे) साजरा केला जातो.जगात आई-वडील या शब्दाला सुध्दा तोड नाही.कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका -काकु,माऊशी,आत्या इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत.परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल.उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी-पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल.मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे आई-वडिलांच नात. वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते.कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते.कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते. त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल आईला कळत-नकळत कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते.आई अशी दैवी शक्ती आहे की आकाश पाताळ एक करते.परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही. आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करीत असते. आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न-भूतो-न-भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे.कारण वडिल भुक-तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या



आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते.कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते.म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही. म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच आहे त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे.आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविन आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणीना-कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.या उलटं वडिलांचे आहे.एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात.म्हणजेच वडील तीथे नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते.कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते.त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करने,पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक मातृदिन दीसुन येईल.माझ्यामते मातृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा.दररोज साजरा का करू नये? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दु:ख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे.कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई- वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल.मातृदिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृतीच जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल.पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व टी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी, आजोबा,काका, काकु,मामा,मामी, मावशी,आत्या इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे.त्यामुळे अंकल-न्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे.त्याचबरोबल मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मानच अवश्य होईल असे मला वाटते.सध्याच्या काळात काही मुल-मुली आई-वडिलांची सेवा करण्यास असमर्थ दिसून येतात अशा परिस्थितीत आई-वडिलांना वृध्दाश्रमाच्या खाईत लोटतात हेही आई-वडिलांच्या प्रती दुर्भाग्यच म्हणावे लागेल.परंतु असे व्हायला नको असे मला वाटते.आपण ११ मे ला मातृदिन (मदर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने दिवसेंदिवस हवामानात बदल होत आहे.याकरीता जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.जय हिंद.

-----------------------

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# मुल म्हणजे ‘आई’साठी सर्वस्व असते!

प्रविण बागडे
नागपूर,९९२३६२०९१९



मातृदिन हा आईचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो. दरवर्षी संयुक्त राज्य आणि इतर काही देशांमध्ये मे च्या दुसऱ्या रविवारी साजरा केला जातो. १९१२ मध्ये ‘मदर्स डे’ चे संस्थापक अण्णा जार्विस यांनी ‘मे मध्ये दुसरा रविवार’ आणि ‘मदर्स डे’ या म्हणीचा ट्रेडमार्क केला आणि मदर्स डे इंटरनॅशनल असोसिएशनची स्थापना करुन माता आणि मातृत्वाच्या सन्मानार्थ मातृदिन साजरा करण्याची कल्पना सुचविली होती. १९१४ मध्ये तिला राष्ट्रीय मान्यता मिळविण्यात यश आले. तेव्हापासुन या दिवशी लोक आईचा आदर म्हणुन तिला सप्रेम भेट म्हणून एखादी प्रिय वस्तू आणि शुभेच्छा देवून ‘मदर्स डे’ साजरा करतात. तसेच हा कुटुंबातील किंवा व्यक्तीच्या आईचा तसेच मातृत्व, मातृबंध आणि समाजातील मातांचा प्रभाव यांचा सन्मान करणारा उत्सव आहे. हा जगातील बराच भागांमध्ये विविध दिवसांमध्ये साजरा केला जातो, सामान्यतः मार्च किंवा मे महिन्यांत हा साजरा केला जातो. काही देशात जसे बल्गेरिया आणि रोमानिया येथे जागतिक महिला दिन हा दिवस ‘मदर्स डे’ म्हणून साजरा केला जातो.

भारतीय संस्कृतीत आधुनिक ‘मदर्स डे’ आत्मसात करण्यात आला आहे आणि दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी साजरा केला जातो. भारतीय लोक हा प्रसंग धार्मिक कार्यक्रम म्हणून साजरा करत नाहीत; त्याचा उत्सव मुख्यतः शहरी भागांपुरता मर्यादित आहे जेथे या प्रसंगाचे मोठ्या प्रमाणावर व्यापारीकरण केले गेले आहे. या दिवशी मुले आई आणि आजी यांना भेटवस्तू देतात. हे अशाच प्रकारच्या उत्सवांना पूरक आहे, मुख्यत्वे व्यावसायिक हितसंबंधांमुळे, कुटुंबातील सदस्यांचा सन्मान करणे, जसे की फादर्स डे, सिबलिंग डे आणि आजी-आजोबांचा दिवस. हजारो वर्षांपासून जगभरात अस्तित्त्वात असलेल्या माता आणि मातृत्वाच्या अनेक पारंपारिक उत्सवांशी त्याचा थेट संबंध नाही, जसे की ग्रीक पंथ ते सायबेले, मातृदेवता रिया, हिलारियाचा रोमन सण किंवा इतर ख्रिश्चन धर्मगुरू मदरिंग रविवारचा उत्सव मदर चर्चच्या प्रतिमेशी संबंधित आहे. तथापि, काही देशांमध्ये ‘मातृदिन’ अजूनही या जुन्या परंपरांचा समानार्थी आहे.

आई म्हणजे ममता, तसेच आई म्हणजे आत्मा आणि आई म्हणजे ईश्वर या दोघांचा संगम म्हणजे ‘आई’ होय. मायेची पाखरण करणारी एक स्त्री. एखादी स्त्री जेव्हा आपल्या अपत्यास जन्म देते त्यावेळेस तिला मातृत्व प्राप्त होते आणि तेव्हाच समाजाच्या दृष्टीने ती त्या अपत्याची आई बनते. आईचे खरे प्रेम आणि पालनपोषण या सोबत कशाचीही तुलना केली जाऊ शकत नाही. आमच्या आयुष्यातील ती एकमेव महिला आहे जी कोणत्याही हेतूशिवाय आपल्या मुलांवर भरपूर प्रेम करते. मूल म्हणजे आईसाठी सर्वस्व असते. ती एक चांगली श्रोता आहे आणि आम्ही सांगत असलेल्या आमच्या चांगल्या आणि वाईट गोष्टी ऐकत असते. ती आम्हाला कधीही रोखत नाही आणि कोणत्याही प्रकारे आम्हाला बांधत नाही. ती आम्हाला चांगल्या आणि वाईट मधील फरक शिकवते. आई आम्हाला प्रत्येक आनंदात आणि दुःखात मदत करते, जेव्हा आपण आजारी असतो, तेव्हा ती आपल्यासाठी रात्रभर जागी राहुन आपल्या चांगल्या आरोग्यासाठी देवाची प्रार्थना करते.

शब्द मानवी भावनांशी निगडित असून त्यास माणसाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. स्त्रीने जन्म दिला नसतानाही ती सवतीच्या मुलाची किंवा दत्तक मुलाची आई बनते. आई ही शांतादुर्गाचे रूप आहे, मराठी भाषेतला ‘आई’ हा आई मायेचा सागर आहे. मराठीतील प्रसिद्ध कवी यशवंत यांनी आपल्या कवितेत ‘स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी’ ही ओळ लिहून ‘आई’ या शब्दाची महानताच थोडक्यात सांगीतले. आजच्या दिनी सर्वांना ‘मदर्स डे’ च्या शुभेच्छा!

घर सुटतं पण आठवण कधीच सुटत नाही !
जीवनात आई नावाचं पान कधीच मिटत नाही !!

## कुकरमध्ये १० मिनिटांमध्ये बनवा चटकदार आंबटगोड कैरीचे लोणचं! पदार्थ पाहून तोंडाला सुटेल पाणी, नोट करून घ्या रेसिपी



उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये प्रत्येक घरात लोणच, वाळवणाचे पदार्थ, कुरडया, पापड इत्यादी अनेक पदार्थ बनवले जातात. या दिवसांमध्ये वर्षभर पुरतील असे पदार्थ बनवले जातात. याशिवाय उन्हाळ्यात कच्च्या कैरीपासून आवर्जून बनवला जाणारा पदार्थ म्हणजे कच्च्या कैरीचे लोणचं. लोणचं पाहिल्यानंतर अगदी लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांच्या तोंडाला पाणी सुटते. जेवणात कैरीची लोणचं असेल तर दोन घास जेवण जास्त जात. बऱ्याचदा बाजारातून विकत आणलेले लोणचं एक किंवा दोन महिन्यानंतर लगेच खराब होऊन जाते. लोणच्यामधील तेल खराब होणे, लोणच्याला बुरशी येणे इत्यादीमुळे लोणचं खराब होऊन जाते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला कुकरचा वापर करून १० मिनिटांमध्ये चटपटीत मसालेदार कच्च्या कैरीचे लोणचं बनवण्याची सोपी कृती सांगणार आहोत. बऱ्याचदा लोणचं मुरण्यासाठी ३ ते ४ दिवसांचं वेळ लागतो. पण कुकरमध्ये लोणचं झटपट तयार होते.

साहित्य:

कच्ची कैरी
लोणचं मसाला
मोहरीची डाळ
हळद
तेल
बडीशेप
जिरं
मेथी दाणे
मोहरी
कलोंजी
लाल तिखट
हिंग
ओवा

कृती: कच्च्या कैरीचे लोणचं बनवण्यासाठी सर्वप्रथम, कैरी स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर कैरीचे बारीक बारीक तुकडे करा.

कैरीच्या तुकड्याना हळद आणि चवीनुसार मीठ टाकून मिक्स करून घ्या.

पॅनमध्ये मेथी, ओवा, बडीशेप, धणे, मोहरी आणि काळीमिरी घेऊन खमंग भाजून घ्या. त्यानंतर जाडसर पावडर बनवा. भाजून घेतलेल्या मसाल्यांमध्ये कलोंजी मिक्स करा.

कुकरमध्ये तेल गरम करून त्यात हिंग आणि लाल तिखट टाकून कच्च्या कैरीचे बारीक तुकडे टाकून मिक्स करून घ्या.

त्यानंतर मसाला व्यवस्थित मिक्स करून कुकरचे झाकण लावून ५ मिनिटं ठेवा. त्यानंतर तयार केलेला मसाला त्यात टाकून व्यवस्थित मिक्स करा.

तयार केलेले लोणचं थंड झाल्यानंतर काचेच्या बरणीमध्ये भरून ठेवा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले कच्च्या कैरीचे लोणचं.

## उन्हाळ्यात शरीराला थंडावा देण्यासाठी सोप्या पद्धतीमध्ये बनवा विकतसारखा बदाम शेक,नोट करून घ्या शेक बनवण्याची रेसिपी



कडक उन्हाळ्यात शरीराला थंडाव्याची आवश्यकता असते. कारण या दिवसांमध्ये शरीराला जास्त पाण्याची आवश्यकता असते. उन्हाळ्यात बाहेर जाऊन आल्यानंतर किंवा इतर वेळी सतत घाम येतो. सतत येणाऱ्या घामामुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होण्याची शक्यता असते. शरीरातील पाणी कमी झाल्यानंतर डिहायड्रेशन, अंगात उष्णता वाढणे इत्यादी अनेक समस्या उद्भवतात. या सर्व समस्या उद्भवू नये म्हणून उन्हाळ्यात भरपूर पाणी, थंड पदार्थांचे सेवन करावे. आज आम्ही तुम्हाला कडक उन्हाळ्यात शरीराला थंडावा देण्यासाठी बदाम शेक बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. बदाम शेक लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं आवडते. बदाम आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहेत. त्यामुळे दिवसाची सुरुवात तुम्ही बदाम शेक पिऊनसुद्धा करू शकता. चला तर जाणून घेऊया बदाम शेक बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य:

दूध
बदाम
कस्टर्ड पावडर
जायफळ पावडर
वेलची
केशर काड्या
काजू, पिस्त्याचे तुकडे
साखर


कृती: बदाम शेक बनवण्यासाठी सर्वप्रथम, ८ ते ९ बदाम पाण्यात रात्रभर भिजत ठेवा, भिजलेल्या बदामाची साल काढून घ्या.


कढईमध्ये दूध गरम करून ते आटेपर्यंत व्यवस्थित मिक्स करत राहा. १ लिटर दूध अर्धा लिटर झाल्यानंतर गॅस मंद आचेवर ठेवा. आटलेल्या दुधात साखर घालून मिक्स करून घ्या. साखर पूर्णपणे विरघल्यानंतर कस्टर्ड पावडर घालून पुन्हा एकदा व्यवस्थित मिक्स करा.

त्यानंतर दूध सतत मिक्स करत राहा. ज्यामुळे दुधाच्या गुठळ्या होणार नाहीत.

मिक्सरच्या भांड्यात साल काढून घेतलेले बदाम आणि थोडस पाणी घालून बारीक पेस्ट तयार करा. तयार केलेली पेस्ट दुधामध्ये मिक्स करा. त्यानंतर त्यात वेलची पावडर, जायफळ पावडर आणि केशर काड्या टाकून मिक्स करा. गॅस बंद करून तयार केलेले मिश्रण मोठ्या वाटीमध्ये काढून घ्या. त्यानंतर फ्रिजमध्ये २ किंवा ३ तास सेट होण्यासाठी ठेवा. तयार आहे आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले बदाम शेक. तुम्ही बनवलेले हे बदाम शेक घरातील सगळ्यांचं नक्की आवडेल.

## वयाच्या पन्नाशीमध्ये कायम तरुण दिसण्यासाठी आहारात करा ‘या’ पौष्टिक पदार्थांचे सेवन, दीर्घकाळ राहालं सुंदर आणि हेल्दी





वयाच्या प्रत्येक टप्प्यात महिलांसह पुरुषांच्या शरीरात सतत काहींना काही बदल होत असतात. त्वचा, हाडांमध्ये वाढलेल्या वेदना, त्वचेवरील सुरकुत्या किंवा आरोग्यासंबंधित इतरही समस्या वाढू लागतात. त्यामुळे वयाच्या पन्नाशीमध्ये तरुण दिसण्यासाठी महिला सतत काहींना काही करत असतात. कधी आहारात होणारे बदल, अधिक व्यायाम, ध्यान इत्यादी अनेक गोष्टी केल्या जातात. वाढते वय कधीच कोणाला थांबवता येत नाही. त्यामुळे वाढत्या वयानुसार शरीरात होणारे बदल स्वीकारणे आवश्यक आहे. वयाच्या पन्नाशीमध्ये त्वचेवर वाढलेल्या सुरकुत्या कमी करण्यासाठी महिला बाजारात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या प्रॉडक्ट किंवा क्रीमचा वापर करतात. मात्र तरीसुद्धा त्वचेमध्ये फारसा बदल दिसून येत नाही. त्वचेचे सौंदर्य वाढवण्यासाठी चेहऱ्याला वरून पोषण देण्याऐवजी आतून पोषण देणे आवश्यक आहे.

बऱ्याचदा बॉलिवूडमधील सेलिब्रिटी वय वाढल्यानंतर सुद्धा अतिशय सुंदर आणि अधिक तरुण दिसतात. चेहऱ्यावर हे तारुण्य वाढवण्यासाठी कोणत्याही क्रीमचा वापर न करता आहारात बदल करून त्वचेची आणि फिटनेसची योग्य काळजी घेतली जाते. महिलांनी वयाच्या ३० नंतर स्वतःच्या आरोग्याची जास्त काळजी घ्यावी. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला वयाच्या पन्नाशीमध्ये कायम तरुण आणि सुंदर दिसण्यासाठी आहारात कोणत्या पदार्थांचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.

फायबर: दैनंदिन आहारात कायम फायबर युक्त पदार्थांचे भरपूर सेवन करावे. फायबर शरीरासाठी आवश्यक असतात. यामुळे शरीरात साचून राहिलेले विषारी घटक सहज बाहेर पडून जातात. ज्यामुळे पोट स्वच्छ होऊन पचनक्रिया सुधारते. पचनाच्या सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी आहारात फायबरयुक्त पदार्थ खावेत. त्यामध्ये तुम्ही फळे, हिरव्या पालेभाज्या, कडधान्य, ड्रायफ्रूट इत्यादी पदार्थांचे सेवन करू शकता. फायबरयुक्त पदार्थांचे आहारात नियमित सेवन केल्यामुळे शरीरातील रक्ताची पातळी नियंत्रणात राहते.

विटामिन सी: काळवंडलेली त्वचा, टॅनिंग किंवा इतर काळे डाग घालवण्यासाठी आहारात विटामिन सी युक्त पदार्थांचे नियमित सेवन करावे. आहारात लिंबू पाणी, नारळ पाणी, पपई, संत्री, शिमला मिरची, मिरची, हिरवे मटार, आंबट पदार्थ इत्यादींचे सेवन करावे. हिरव्या पालेभाज्यांमधून शरीराला भरपूर प्रमाणात विटामिन सी मिळते. त्यामुळे रोजच्या आहारात विटामिन सी युक्त पदार्थांचे नेहमीच सेवन करावे. आंबट पदार्थ खाल्यामुळे शरीरात कोलेजनचे उत्पादन वाढते आणि त्वचा कायम तरुण आणि सुंदर दिसते.

कॅल्शियम: कॅल्शियम युक्त पदार्थांचे रोजच्या आहारात सेवन केल्यामुळे शरीरातील हाडांना अनेक फायदे होतात. वय वाढल्यानंतर हाडांमधील कॅल्शियमचे प्रमाण कमी होऊन जाते. कॅल्शियम कमी झाल्यानंतर हाडं वारंवार दुखणे, हाडांमध्ये वाढलेल्या वेदना, हाडांना सूज येणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. या सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी आहारात दूध, पनीर, हिरव्या पालेभाज्या, ब्रोकोली, सोयाबीन, नट्स, टोफू इत्यादी पदार्थांचे नियमित सेवन करावे. यामुळे शरीरात कॅल्शियम वाढेल.

## जेवल्यानंतर पोटात लगेच गॅस होतो? वाढत्या ॲसिडिटीपासून आराम मिळवण्यासाठी नियमित करा ‘या’ पदार्थांचे सेवन

दैनंदिन आहारात बऱ्याचदा तिखट किंवा तेलकट पदार्थांचे अतिसेवन केल्यामुळे शरीराला हानी पोहचते. याशिवाय काहींना लगेच ॲसिडिटीचा त्रास जाणवू लागतो. पोटात दुखणे, गॅस होणे, ॲसिडिटी वाढणे, आंबट ढेकर येणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. या समस्या उद्भवू लागल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने गोळ्या औषध खाल्ली जातात. मात्र वारंवार गोळ्या औषधांचे सेवन करणे आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. आहारात सतत होणारे बदल, कामाचा वाढलेला तणाव, अपुरी झोप इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. यामुळे शरीराची पचनक्रिया बिघडण्याची शक्यता असते. त्यामुळे दैनंदिन आहारात कोणत्याही तिखट किंवा तेलकट पदार्थांचे सेवन करण्याऐवजी आहारात बदल करून शरीराची योग्य काळजी घ्यावी. आपल्यातील अनेकांना जेवल्यानंतर लगेच पचनाची समस्या, पोटात तयार होणारे वायू इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. दुपारी किंवा रात्रीच्या जेवणानंतर अनेकांना लगेच झोपण्याची सवय असते. पण जेवण केल्यानंतर लगेच झोपल्यास शरीराला हानी पोहचण्याची शक्यता असते. कारण जेवलेले अन्नपदार्थ शरीरात पचन होत नाहीत. यामुळे आम्लपित्ता आणि इतर समस्या वाढू लागतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला शरीरात वाढलेली ॲसिडिटी कमी करण्यासाठी स्वयंपाक घरातील कोणत्या पदार्थांचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या पदार्थांच्या सेवनामुळे शरीरातील अनेक समस्या दूर होतील. याशिवाय पोट फुगणे किंवा पोटात वाढलेली ॲसिडिटी नियंत्रणात राहील. ओव्याचे सेवन: ओव्याचे बारीक दाणे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. ओवा खाल्यामुळे शरीराची बिघडलेली पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. याशिवाय पोटात निर्माण झालेला गॅस कमी होऊन तात्काळ आराम मिळतो. शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर काढून टाकण्यासाठी नियमित सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी ओव्याच्या पाण्याचे सेवन करावे. यामुळे संपूर्ण दिवस आनंदात जातो. पोटासंबंधित कोणतीही समस्या उद्भवत नाही. ओव्यामध्ये थायमॉल नावाचा घटक आढळून येतो, ज्यामुळे शरीरात वाढलेली ॲसिडिटी कमी होते. याशिवाय दाहक-विरोधी आणि उच्छ्वासविरोधी गुणधर्म पोटातील सर्व घाण बाहेर काढून टाकतात.

## दैनंदिन आहारातील ‘हे’ पदार्थ चुकीच्या पद्धतीने खाल्यास शरीराचे होईल नुकसान, जाणून घ्या पदार्थ खाण्याची योग्य पद्धत

शरीर कायम निरोगी आणि हेल्दी ठेवण्यासाठी रोजच्या आहारात अनेक वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन केले जाते. फळे, पालेभाज्या, संपूर्ण धान्य, श्रीधान्य, मसाले आणि इतर पौष्टिक पदार्थ खाल्ले जातात. या पदार्थांचे सेवन केल्यामुळे शरीर तंदुरुस्त आणि हेल्दी राहते. पण बऱ्याचदा आहारात चुकीच्या पद्धतीने पदार्थांचे सेवन केल्यास शरीराला हानी पोहचण्याची शक्यता असते. चुकीच्या पद्धतीने अन्नपदार्थांचे सेवन केल्यामुळे शरीराला ते पदार्थ व्यवस्थित पचन होत नाही. ज्यामुळे शरीराची पचनक्रिया बिघडते. पोटात दुखणे, पोट फुगणे, गॅस,अपचन इत्यादी अनेक समस्या वाढू लागतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला दैनंदिन आहारातील अन्नपदार्थ कशा पद्धतीने खावेत? अन्नपदार्थ खाण्याची योग्य पद्धत काय? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. यामुळे शरीराला कोणतीही हानी पोहचणार नाही.

अळशीच्या बिया:

निरोगी आरोग्यासाठी अळशीच्या बिया अतिशय पौष्टिक आहेत. अळशीच्या बियांमध्ये आढळून येणारे फायबर शरीरासाठी अतिशय गुणकारी ठरते. यामध्ये फायबर, ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि इतर पोषक तत्वे मोठ्या प्रमाणात आढळून येतात. यामुळे वाढलेले वजन नियंत्रणात राहते, पचनक्रिया सुधारते, हाडे मजबूत राहतात इत्यादी अनेक फायदे शरीराला होतात. पण अनेक लोक अळशीच्या बिया संपूर्ण चावून खातात. पण या पद्धतीने खालेल्या बिया शरीरातून तशाच बाहेर येतात. त्यामुळे अळशीच्या बिया बारीक वाटून खाव्यात. वाटून खाल्लेल्या बिया शरीराला सहज पचन होतात.



हळद:

जेवणातील प्रत्येक पदार्थ बनवताना हळदीचा वापर केला जातो. हळदीच्या वापरामुळे पदार्थाची चव आणि रंग वाढण्यास मदत होते. यामध्ये असलेले क्युमिन शरीरासाठी फायदेशीर ठरते. याशिवाय यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि दाहक-विरोधी गुणधर्म शरीराची रोगप्रतिकारशक्ती सुधारतात. कोणत्याही गंभीर आजारांपासून सुटका मिळवण्यासाठी हळदीचा वापर करावा. शरीरात वाढलेली जळजळ कमी करण्यासाठी हळदीच्या दुधाचे सेवन करावे. हळदीचे सेवन करताना नुसतीच हळद खाऊ नये. हळदीमध्ये काळीमिरी मिक्स करून खावी.

अळंबी:

मशरुम किंवा अळंबींचे सेवन करणे आरोग्यासाठी पौष्टिक आहे.यामध्ये प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे इत्यादी अनेक पोषक घटक आढळून येतात. याशिवाय रक्तक्षय, हृदयविकार आणि कर्करोग इत्यादी आरोग्यासंबंधित गंभीर आजारांपासून सुटका मिळवण्यासाठी आहारात अळंबीचे सेवन करावे. जेवणातील अनेक पदार्थ बनवताना अळंबीचा वापर केला जातो.

## चिपळूण येथील डि. बी. जे. महाविद्यालयाची विद्यार्थिनी दिव्या विजय गुरव वाणिज्य शाखेत प्रथम

संगमेश्वर / प्रतिनीधी :- येथील नवकोकण एज्युकेशन सोसायटी संचलित डि. बी. जे. महाविद्यालयाची विद्यार्थीनी दिव्या गुरव वाणिज्य शाखेत तृतीय वर्षात सर्वप्रथम आली आहे. शेतकरी कुटुंबातून असलेल्या दिव्याने मेहनतीच्या जोरावर यश संपादन केल्याने तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



नवकोकण एज्युकेशन सोसायटी संचलित डि. बी. जे. महाविद्यालयाची यशस्वी परंपरा दरवर्षीप्रमाणे यंदाही कायम राहिली आहे. या महाविद्यालयाचा उत्तम शिक्षण देण्यासोबत गुणवंत विद्यार्थी घडविण्यावर जास्त भर असतो. त्यामुळेच या महाविद्यालयाचे नाव चिपळूण येथे शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्याने घेतले जाते. अशा या प्रतिष्ठित व नावाजलेल्या महाविद्यालयाचा अपेक्षेप्रमाणे निकाल लागला असून सर्व विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेले आहेत. यामध्ये वाणिज्य शाखेच्या तृतीय वर्षाच्या परीक्षेत दिव्या गुरव ही सर्वप्रथम आली आहे.

दिव्याची घरची परिस्थिती जेमतेमच असून ती एका गरीब शेतकरी कुटुंबातून आली आहे. वडील शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित असून त्यांना दोन्ही मुलीच आहेत. दिव्याची मोठी बहीण कंपनीत कामाला जाऊन वडिलांना हातभार लावण्याचा प्रयत्न करते. दोन्ही मुली हुशार असल्याने व वडिलांना कामात मदत करत असल्याने त्यांनी मुलाची उणीव भरून काढली आहे. दिव्या पहिल्यापासूनच अभ्यासात तरबेज असल्याने तिला परीक्षेत उत्तीर्ण होण्याची खात्री होती परंतु सर्वप्रथम आल्याचे कळताच तिचा आनंद द्विगुणित झाला आहे. तिच्या या यशामागे वडिलांचा आशिर्वाद आणि बहिणीची साथ ही देखील तितकीच मोलाची आहे.

आपल्या या यशाबद्दल दिव्याने सर्व शिक्षकवृंद, प्राचार्य यांचे आभार मानले आहे. तिच्या या निकालाबाबत सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दिव्या ही पुणे येथील पत्रकार विलास गुरव यांची पुतणी असून त्यांनीदेखील तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## १० मे पासून सुरू होणारे ग्रामीण टी १० क्रिकेट सामने स्थगित

लातूर :-- क्रीडा प्रेमीसाठी पर्वणी असलेले ग्रामीण टी १० क्रिकेट सामने १० मे २०२५ पासून सुरु होणार होते मात्र हे सामने स्थगित करण्यात आले असल्याची माहिती आयोजन समितीकडून देण्यात आली आहे. जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने प्रतीवर्षी ग्रामीण टी १० सामने तालुका व जिल्हा स्तरावर खेळवले जात आहेत. २०२५ मधील सामन्याची तयार लातूर जिल्ह्यातील विविध तालूक्यात मोठ्या प्रमाणात करण्यात आली होती मात्र भारताच्या सिमेवर वाढलेल्या तणावामुळे वाढत्या राष्ट्रीय सुरक्षा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या वर्षीचे क्रिकेट सामने स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या निर्माण झालेल्या भारत पाकिस्तान युध्दजन्य परिस्थितीत आपल्या सशस्त्र दलाचे, अधिका-यांचे मनोबल वाढवणे व नागरिकांची सुरक्षा सर्वोच्चस्थानी असायला हवी म्हणून ग्रामीण टी १० क्रिकेट सामने स्थगित करण्यात आले आहेत, असे आयोजन समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायतीची निवडणुक जाहीर करावी ग्रामस्थांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

लातूर : दि. २४ एप्रिल २०२५ रोजी लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील गावच्या सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत होऊन मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार सरपंच पदाचे आरक्षण जाहीर केले गेले परंतु काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर केले गेले नाही. ग्रामपंचायतीची स्थापना झाल्यापासून म्हणजेच मागील ३ वर्षापासून स्थानिक प्रशासनामार्फत आपल्या या ग्रामपंचायत मध्ये निवडणूक घेण्याबाबत कसल्याही प्रकारची हालचाल दिसून येत नाही, प्रशासन कुठल्याही स्तरावर प्रयत्नशील असल्याचे दिसून येत नाही, संबंधित स्थानिक अधिकारी कुठल्या तरी राजकीय दबावाला बळी पडत असल्याचे एकंदर दिसून येत आहे. कारण आपल्या ग्रामपंचायत मधील मतदान केंद्रावर लोकसभा निवडणूकीत मतदान झाले, विधानसभा निवडणूकीत मतदान झाले, मग ग्रामपंचायतीची निवडणूक घेण्यास प्रशासनाला काय अडचण असावी ? हा प्रश्न निर्माण होतो. लातूर तालुक्यातील आपली ग्रामपंचायत ही १११ वी ग्रामपंचायत म्हणून उदयास आली, असे असताना आरक्षणाची सोडत मात्र ११० ग्रामपंचायतचीच झालेली आहे.

# लातूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने रेल्वे स्थानकात मॉक ड्रिल...!





पोलीस यंत्रणा व इतर विभाग तातडीने घटनास्थळी पोहचुन दोन्ही दहशतवाद्यांना ताब्यात घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली तसेच सदर घटनेमध्ये जखमी नागरिकांना ताबडतोब उपचारासाठी हलवण्यात आले. तसेच बीडीडीएस, आय.कारच्या साह्याने सदर दहशतवाद्यांच्या ताब्यातील बॅगामध्ये स्फोटक पदार्थ ठेवल्याची शक्यता असल्याने तपासणी करण्यात आली. फॉरेन्सीक लॅब मार्फतीने घटनास्थळाचे भौतीक दुवे तपासण्यात आले. ट्राफिक अंमलदारांच्या मदतीने रस्तावरील गर्दी सुरळीत करण्यात आली. तसेच स्टेशनवरील झालेला गोंधळ मेगा फोन व्दारे सुचना देवुन नियंत्रणात आणण्यात आला.

सदर मॉक ड्रिल अनुषंगाने सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे कोणत्याही प्रकारचा हल्ला झाल्यास नागरिकांनी कशा प्रकारे वागावे, सुरक्षितेच्या कोणकोणत्या योजनाच्या अवलंब करावा, गोंधळून न जाता संयमाने परिस्थितीस कसे सामोरे जावे यासंदर्भात अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांनी जमलेल्या लोकांना व प्रशासनाने काय करावे तसेच नागरीकांनी प्रसंग अवधान राखुन काय काळजी घ्यायला पाहीजे या बाबत सदर रंगीत तालीमव्दारे दर्शविण्यात आले. तसेच नागरीकांना जागरुक राहुन शहराच्या सुरक्षेच्या अनुषंगाने काहीही माहीती असल्यास नियंत्रण कक्ष, लातूर फोन क्र.०२३८२-२४२२९६, डायल ११२ वर संर्पक करुन कळवावे असे अवाहन लातूर जिल्हा पोलीस दलांच्या वतीने करण्यात येत आहे.

सदर रंगीत तालीम (मॉक ड्रील) लातूर प्रशासनाच्या वतीने पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली यावेळी सर्व विभागाचे मिळून ४३ अधिकारी २४० पोलीस अंमलदार व कर्मचारी यांनी सदर मग ड्रिल मध्ये सहभाग घेतला.

महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, मनपा प्रभारी आयुक्त देविदास जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) रणजीत सावंत, लातूर तहसीलदार सौदागर तांदळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, गोपनीय शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, यांच्यासह पाचही पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व अंमलदार,आरसीपी प्लाटून क्यूआरटी प्लाटून यांच्यासह लातूर जिल्हा पोलीस दल, लातूर महसूल विभाग, लातूर अग्निशामक दल, आरोग्य विभाग, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिकारी कर्मचारी, रेल्वे पोलीस दलाचे जीआरपी व आरपीएफ पथक, लातूर आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी व कर्मचारी, लातूर दहशतवादी विरोधी पथक, बिडीडीएस पथक ,अंगुलीमुद्रा विभाग उपस्थित होते सदर रंगीत तालीम ही दिनांक १०/०५/२०२५ चे दुपारी २ वाजले पासून ते ३ वाजेपर्यंत घेण्यात आली.

# मनपाच्या आरोग्य शिबिराचा नागरिकांनी घेतला लाभ

## विविध वॉर्ड मधे १४ आरोग्य शिबिरांचे आयोजन , ८६७ नागरिकांची तपासणी








लातूर /प्रतिनिधी : आरोग्य विभाग,लातूर शहर महानगरपालिका लातूर यांच्यावतीने शहरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने नियोजन आयुक्त देविदास जाधव व उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या वतीने केले जात आहे. त्यानुसार उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या संकल्पनेतून प्रत्येक दवाखाना अंतर्गत दर महिन्याच्या २९ व ३० तारखेला सार्वजनिक ठिकाणी/वॉर्ड मधे आरोग्य शिबिर घेण्यास सुरुवात झाली आहे . परंतु , मागील महिन्यात काही शिबिर झाली नसल्याने आज दि.०९/०५/२०२५ रोजी एकूण १४ ठिकाणी आरोग्य शिबीर घेण्यात आले व त्यात तब्बल ८६७ रुग्णांची तपासणी करण्यात आले .

मनपा आरोग्य विभागा अंतर्गत कार्यन्वित असलेले एकूण ३२ आरोग्य केंद्र येथे दैनंदिन आरोग्य सेवा सुविधा नागरिकांना मनपा देत असते.. परंतु शासकीय योजना व आरोग्य सुविधा अधिकाधिक नागरिकान पर्यंत पोचवण्याचा दृष्टीने संबंधित दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात दरमहा शिबिर घेऊन किमान १०० रुग्णांची तपासणी करण्याचे निर्देश उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी विभागास दिले आहेत.

त्यानुसार आरोग्य विभागाने प्रत्यक्ष वॉर्ड मधे कैंप घेऊन यावेळी एकूण १४ आरोग्य केंद्र मार्फत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते दि. ०९/०५/२०२५ रोजी आरोग्य शिबिरामध्ये एकूण ८६७ रुग्णाची वैद्यकीय तपासणी करून मोफत औषध उपचार करण्यात आले.या सर्व रुग्णांना या शिबिराचा लाभ झाला असून रक्तदाब, मधुमेह रुग्णचे निदान व महाविद्यालयीन विद्यार्थी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे .या शिबिरास मनपा उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती यांनी भेटी देऊन आढावा घेतला.

सदरील आरोग्य शिबिर एप्रिल महिन्यापासून दरमहा २९ व ३० तारखेला नियमित पणे शहराच्या वेगवेगळ्या भागात होणार असल्याने मनपाच्या आरोग्य सेवा अधिकाधिक नागरीकापर्यंत पोचवता येतील व या आरोग्य शिबिराचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान मनपा मार्फत करण्यात आले आहे. सर्वाधिक रुग्णतापासणी आयुष्मान आरोग्य मंदिर ट्युशन एरिया अंतर्गत १२१ रुग्णाची तपासणी करण्यात आली व आयुष्मान आरोग्य मंदिर आनंद नगर अंतर्गत ११६ रुग्णाची तपासणी करण्यात आली. या दोन आरोग्य केंद्र १०० पेक्षा जास्त रुग्णाची तपासणी करण्यात आली आहे

# जिल्हा परिषदेत बदल्यासाठी ३४७ अर्ज दाखल



लातूर : प्रतिनिधी-लातूर जिल्हा परिषद अंतर्गत वर्ग-क व वर्ग-ड कर्मचा-यांच्या नियमित बदल्यांसाठी कार्यरत पदावरील कर्मचा-यांची सेवा जेष्ठता यादी तयार करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या वर्ग-क व वर्ग-ड मधील ३४७ कर्मचा-यांनी विनंती बदल्यांसाठी अर्ज केले आहेत. अनेक कर्मचारी आपल्याला सोयीचे ठिकाण मिळावे म्हणून हालचाली करताना दिसून येत आहेत. तसेच जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या बदल्यांसाठी जिल्हा परिषदेची तयारीही जवळपास पूर्ण झाली असून मंगळवार दि. १३ मे रोजी सकाळी १० वाजता समुपदेशनाने प्रशासकीय व विनंती बदल्या होणार आहेत.

लातूर जिल्हा परिषदेतील वर्ग-क व वर्ग-ड कर्मचा-यांच्या प्रशासकीय व विनंती बदल्यासाठी गेल्या महिणा भरापासून हालचाली सुरू आहेत. गेल्यावर्षी सदर बदल्या लोकसभा व विधान सभेच्या निवडणूकीच्या आचारसंहितेमुळे होऊ शकल्या नव्हत्या. त्यामुळे यावर्षी अनेक कर्मचारी बदल्यांसाठी इच्छूक आहेत. तसेच अनेक कर्मचारी एकाच टेबलवर ब-याच वर्षापासून ठाण मांडून आहेत. तर कांहीजन पदोन्नती होऊनही त्याच ठिकाणी प्रभारी म्हणून काम करताना दिसून येत आहेत. जिल्हा परिषदेतील सर्व विभागाकडील संबधीत संवर्गाच्या बदल्याबाबत वास्तव्य सेवा जेष्ठता यादी अद्यावत करण्यात आली आहे. सेवा जेष्ठता यादीवर कांही आक्षेपही आले होते. त्याचे निराकरण करण्यात आले आहे.

कर्मचा-यांच्या बदल्यांसाठी सेवा जेष्ठतेला महत्व असणार आहे. कर्मचा-यांच्या प्रशासकीय बदल्यासाठी १० वर्षाचा कालावधी तर विनंती बदल्यासाठी ३ वर्षाचा कालावधी ग्रा धरला जातो. त्यानुसार बदली प्रक्रीया धोरण राबवले जाणार आहे.

## डी. एम. ज्युनिअर कॉलेजच्या वतीने १२ वी बोर्ड परीक्षेतील गुणवंताचा सत्कार

लातूर : अवंती नगर, लातूर येथील डी.एम. ज्युनिअर कॉलेज चा महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या १२ वी बोर्ड परीक्षेत कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचा निकाल ९६% लागला असून दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी कॉलेज ची यशाची परंपरा कायम राहिली आहे. कॉलेज मधील विज्ञान शाखेचा निकाल ९६% लागला असून विज्ञान शाखेतून सर्वप्रथम कानडे गौरवी (८०%) व देशमुख अनुष्का (८०%) तर द्वितीय नार्वेकर ओम (७५%) आणि तृतीय पाटील श्रीवर्धन (७४%) व वाणिज्य शाखेचा ९४% निकाल लागला असून वाणिज्य शाखेतून सर्वप्रथम रोंगे चैतन्या (८१%), द्वितीय अवधूत साक्षी (७०%), तृतीय कोमटवाड माऊली (६६%) व कला शाखेचा निकाल ६०% लागला असून कला शाखेतून सर्वप्रथम चव्हाण निकिता (६५%), द्वितीय कांबळे अंकिता (५९%), आणि बस्तापुरे निकिता (५७%) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. कॉलेज मधील सर्व यशस्वी व गुणवंत विध्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे संस्था सचिव श्री कालिदासजी माने यांच्या शुभहस्ते तर संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री जी. टी. माने यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मनोज माने , विलासराव देशमुख कनिष्ठ महाविद्यायालयाचे प्राचार्य श्री विवेक माने व डी. एम. कॉलेजचे प्राचार्य श्री चव्हाण एस.एस. यांच्या उपस्थिती मध्ये संपन्न झाला. यावेळी कॉलेज मधून प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विध्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

# वातावरण बदलामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचा समावेश उत्पादन खर्चाच्या पद्धतीमध्ये होण्याची गरज: पाशा पटेल

पुणे: बाजार भाव आणि शेती धोरणांचा फटका शेतकऱ्यांना बसतोच.. परंतु वातावरण बदलामुळे होणाऱ्या नैसर्गिक संकटामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या नुकसानीला आता उत्पादन खर्चाच्या पद्धतीमध्ये समाविष्ट करण्याची गरज निर्माण झाली आहे. भारतीय हवामान विभागाची आकडेवारी आणि संशोधन राज्य कृषी मूल्य आयोगाच्या मार्फत नव्या उत्पादन खर्च प्रणालीमध्ये समाविष्ट करण्याचा गांभीर्यपूर्वक विचार केला पाहिजे, असे परखड मत राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी व्यक्त केले आहे.

राज्य कृषी मुल्य आयोग आणि भारतीय हवामान विभाग (खचऊ) पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त बैठक शुक्रवारी (ता.९) पुण्यातील भारतीय हवामान विभागाच्या मुख्यालयात पार पडली.

'वातावरण बदलाचा शेती क्षेत्रावर परिणाम' या गंभीर विषयावर झालेल्या पहिल्याच महत्वपूर्ण बैठकीमध्ये राज्य कृषी मुल्य आयेगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आयोगाचे सहसंचालक विनोद कुलकर्णी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कृषी अर्थशास्त्रज्ञ डॉ. सचिन मोरे तसेच डॉ. कृपाण घोष, प्रमुख, अँग्रीमेट विभाग,के. सी.साई कृष्णन, प्रमुख, खचऊ पुणे,डॉ.ओ.पी श्रिजीत, शास्त्रज्ञ खचऊडॉ. एस.डी. सानप, शास्त्रज्ञ खचऊआरती बंडकर, शास्त्रज्ञ खचऊ आशुतोष मिश्रा, शास्त्रज्ञ, डॉ.ए.डी. ताठे, शास्त्रज्ञ,डॉ.आशा लटवाल आणि इतर मान्यवर सहभागी झाले होते.

या बैठकीमध्ये गेल्या काही वर्षात वातावरण बदलामुळे होणारे शेती क्षेत्रावरील परिणाम याबाबत धीरगंभीर विचार मंथन झाले.२०२४ हे हवामान विभागाच्या दीडशे वर्षाच्या इतिहासात सर्वाधिक उष्ण वर्ष ठरले आहे.

बदलत्या वातावरणाचा सर्वाधिक फटका शेतीला बसत असल्यावर या बैठकीत शास्त्रज्ञ आणि पदाधिकाऱ्यांचे एक मत झाले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कृषी अर्थशास्त्रज्ञ डॉ. सचिन मोरे यांनी सध्याच्या उत्पादन खर्च प्रणाली मध्ये बदल आवश्यक असल्याचे मत मांडले. ते म्हणाले, वातावरणातील बदलांचे प्रमाण गेल्या काही दिवसात वाढल्याचे दिसून येते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE